पोलीस स्टेशन आवारात महिला
समुपदेशन केंद्रे स्थापन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक-समुप-२०१३/प्र.क्र.५ (भाग-२)/ का-१०
नविन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख-१२ जून, २०१९.

वाचा :-

१) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२००१/प्र.क्र.६८/का-२, दिनांक १६ ऑगस्ट, २००१.
२) महिला व बाल विकास विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण-२००१/प्र.क्र.६८/का-२, दिनांक १६ ऑगस्ट, २००३.
३) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२००४/प्र.क्र.१९/का-२, दिनांक ५ डिसेंबर, २००५.
४) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.मसके-२००५/प्र.क्र.२०२/का-२, दिनांक २१ जानेवारी, २००६.
५) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.मसके-२००६/प्र.क्र.२५६/का-२, दिनांक १७ ऑक्टोबर, २००६.
६) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२००९/प्र.क्र.३०६/का-२, दिनांक ३० जून, २०१०.
७) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१०/प्र.क्र.४२३ (भाग-२) /का-२, दिनांक २२ फेब्रुवारी, २०११.
८) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२००९/प्र.क्र.३०६/का-२, दिनांक १ मार्च, २०११.
९) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.समुप-२०१२/प्र.क्र.१९/का-१०, दिनांक २७ जून, २०१२.
१०) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.रिटपी-२०१३/प्र.क्र.१५/का-१०, दिनांक ८ ऑगस्ट, २०१३.
११) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.समुप-२०११/प्र.क्र.१२२/का-१०, दिनांक १९ नोव्हेंबर, २०१३.
१२) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.समुप-२०१३/प्र.क्र.५/का-१०, दिनांक ४ जानेवारी, २०१४.
१३) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.समुप-२०१३/प्र.क्र.२१८/का-१०, दिनांक २४ फेब्रुवारी, २०१४.
१४) महिला व बाल विकास विभाग, आदेश क्र. रिटपी-२०१३/प्र.क्र.२०७/का-१०, दिनांक ३० जुलै, २०१४.

१५) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.समुप-२०१३/प्र.क्र.५ (भाग-२)/का-१०, दिनांक १७ ऑक्टोबर, २०१४.

<u>प्रस्तावना</u> -

महिलांवर व बालकांवर होणाऱ्या अत्याचारांना प्रतिबंध करुन, त्यांना संरक्षण / मदत उपलब्ध करुन देण्याचे दृष्टीने केंद्र शासनाने प्रामुख्याने ज्या सूचना केलेल्या होत्या, त्या अनुषंगाने उपाययोजना करण्यासाठी अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली कृतिदलाची (TASK FORCE) स्थापना करण्यात आलेली होती. सदर कृतिदलाच्या बैठकीमध्ये झालेल्या विचार विनिमयानुसार टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई या संस्थेकडून मुंबईतील तीन पोलीस ठाण्यांच्या आवारामध्ये सन १९९४ पासून चालविण्यात येणाऱ्या कौटुंबिक हिंसाग्रस्त व पिडीत महिलांसाठीच्या समुपदेशन केंद्राच्या धर्तीवरच आणखी काही ठिकाणी महिला समुपदेशन केंद्रे चालविण्याची शिफारस कृतिदलाने केली होती. त्या अनुषंगाने संयुक्त राष्ट्र संघटनेच्या युनिफेम (Unifem-United Nations Development Fund for Women) या आंतरराष्ट्रीय संस्थेने तीन वर्षाच्या कालावधीकरीता उपलब्ध करुन दिलेल्या निधीतून राज्यातील वरील ३ समुपदेशन केंद्रासह एकूण १० ठिकाणी महिला समुपदेशन केंद्रे चालविण्यात येत होती. राज्य शासन, टाटा सामाजिक विज्ञान संस्था आणि युनिफेम यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार, कराराचा कालावधी संपल्यानंतर सदरील केंद्रांचा आढावा घेऊन उपयुक्त वाटल्यास राज्य शासनाने ती पुढील कालावधीकरीता चालवावीत. तसेच, भविष्यात निर्माण करावयाच्या इतर केंद्रांना देखील त्याच अटींवर मंजूरी देण्यात यावी, असा निर्णय संदर्भाधीन क्र.१ येथील दि.१६.८.२००१ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णयास अनुसरुन संदर्भाधीन क्र.३ येथील दि.५.१२.२००५ च्या शासन निर्णयानुसार सदर महिला समुपदेशन केंद्रे राज्य शासनामार्फत चालविण्याचा निर्णय घेण्यात आला.

२. मुंबई उच्च न्यायालयाने क्रिमिनल अपिल नंबर ३५९/२००८ मध्ये The Government of Maharashtra shall create more counseling centers (special cell) for women & children at the taluka level in a phased manner याप्रमाणे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्याच्या दृष्टीने सुरुवातीला ३५ जिल्ह्यांकरीता प्रत्येक जिल्ह्यात ३ याप्रमाणे १०५ समुपदेशन केंद्र स्थापन करण्याची बाब विचाराधीन होती. त्यानुसार संदर्भाधीन क्र.९, १०, १२ व १५ येथील शासन निर्णयान्वये एकूण ९७ समुपदेशन केंद्रांना यापूर्वी मंजूरी देण्यात आली आहे. विचाराधीन १०५ समुपदेशन केंद्रांपैकी उर्वरीत समुपदेशन केंद्रांना मान्यता देणे, न्यायालयीन प्रकरणाच्या अनुषंगाने यापूर्वी देण्यात आलेली मान्यता रद्द करुन सदर समुपदेशन केंद्र चालविण्यासाठी इतर संस्थांची निवड करणे, तसेच समुपदेशन केंद्र बंद करण्यात आल्याने व्दितीय क्रमांकाच्या संस्थेस समुपदेशन केंद्र चालविण्यास मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय</u>-

वरील प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन १०५ समुपदेशन केंद्रांपैकी सोबतच्या **<u>परिशिष्ट-अ</u>** मध्ये नमूद ७ स्वयंसेवी संस्थांना त्यापुढे नमूद केलेल्या जिल्ह्यातील तालुक्यांच्या ठिकाणी पोलीस स्टेशनच्या आवारात समुपदेशन केंद्र सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. न्यायालयीन प्रकरणांच्या अनुषंगाने भंडारा जिल्ह्यातील लाखांदुर व धुळे जिल्ह्यातील शिरपूर येथे संदर्भाधीन दि.४ जानेवारी, २०१४ येथील शासन निर्णयान्वये पोलीस स्टेशनच्या आवारात समुपदेशन केंद्र स्थापन करण्यास यापूर्वी देण्यात आलेली मान्यता रद्द करुन सदर ठिकाणी समुपदेशन केंद्र चालविण्यासाठी इतर संस्थांची निवड करणे याबाबत **<u>परिशिष्ट-ब</u>** मध्ये नमूद २ स्वयंसेवी संस्थांना त्यापुढे नमूद केलेल्या

जिल्ह्यातील तालुक्यांच्या ठिकाणी पोलीस स्टेशनच्या आवारात समुपदेशन केंद्र सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. कणकवली पोलीस स्टेशनच्या आवारात चालू करण्यात आलेले समुपदेशन केंद्र बंद पडल्याने व्दितीय क्रमांकाच्या संस्थेस समुपदेशन केंद्र सुरु करण्यास मान्यता देणेबाबत **परिशिष्ट-क** मध्ये नमूद स्वयंसेवी संस्थेस त्यापुढे नमूद केलेल्या जिल्ह्यातील तालुक्याच्या ठिकाणी पोलीस स्टेशनच्या आवारात समुपदेशन केंद्र सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेल्या तसेच यापूर्वी संदर्भाधीन क्र.९, १०, १२ व १५ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेल्या सर्व समुपदेशन केंद्रांची मान्यता ही सदर शासन निर्णयाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीसाठी किंवा शासनाच्या पुढील आदेशापर्यंत राहील.

५. सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेल्या महिला समुपदेशन केंद्रासाठी संदर्भाधीन क्र.१५ येथील दि.१७ ऑक्टोबर, २०१४ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वे लागू राहतील.

६. सदर केंद्रांना आवश्यक जागा, फर्निचर, टेलिफोन, स्टेशनरी व इतर मुलभूत सुविधा संबंधित पोलीस स्टेशनने उपलब्ध करुन द्याव्यात. सदर समुपदेशन केंद्राकरीता लागणाऱ्या खर्चाचा तपशिल वाचा क्र.१,२ व १२ मधील शासन निर्णयात विहित केल्यानुसार राहील.

७. सदर समुपदेशन केंद्र तात्काळ कार्यान्वित करण्याबाबत कार्यवाही संबंधित जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी करावी व सदर समुपदेशन केंद्र कार्यान्वित झाल्याबाबत पोलीस अधिक्षक यांनी अहवाल आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांना सादर करावा.

८. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांनी वेळोवेळी सदर समुपदेशन केंद्र कार्यान्वित झाल्याबाबत व त्यांच्या कामकाजाबाबत आढावा घ्यावा.

९. पोलीस स्टेशनच्या आवारात कार्यरत महिला समुपदेशन केंद्रातील समुपदेशक सामाजिक कार्य शाखेतील पदव्युत्तर पदवी अर्हताप्राप्त (MSW) असावेत. तसेच सदर समुपदेशकांचे मानधन संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्याने त्या समुपदेशकाच्या स्वत:च्या नावे असलेल्या बँक खात्यात सरळ जमा करण्याबाबत दक्षता घ्यावी. म्हणजे मानधनाची रक्कम स्वयंसेवी संस्थेमार्फत देण्यात येवू नये. मात्र इतर अनुज्ञेय प्रशासकीय खर्च स्वयंसेवी संस्थेला देण्यात यावा.

१०. सदर समुपदेशकाच्या प्रशिक्षणावर शासन खर्च करणार असल्यामुळे, त्यांना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या मान्यतेशिवाय काढून टाकता येणार नाही. तसेच समुपदेशकाने स्वेच्छेने काम सोडल्यास, त्याने संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्यास कळविणे आवश्यक राहील.

११. संबंधित संस्थेने सदर समुपदेशन केंद्रावर खालीलप्रमाणे फलक दर्शनी भागात लावावा. (सदर फलकावर संस्थेचे नाव नसावे.)

“महिला समुपदेशन केंद्र,
(महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र राज्य यांची मान्यता प्राप्त)”

१२. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांना या योजनेसाठी नियंत्रक अधिकारी तसेच जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना आहंरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. आयुक्तांनी सदरची रक्कम संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना वितरीत करावी व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी ती रक्कम कोषागारातून आहरीत करुन संबंधित संस्थांना आवश्यकतेनुसार वितरीत करावी. संबंधित संस्थांनी प्राप्त झालेल्या अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र (Utilisation Certificate) तसेच इतर

आवश्यक माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना वेळोवेळी सादर करावी व त्यांनी आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांना सादर करावी व आयुक्तांनी त्यांचा अहवाल शासनास वेळोवेळी सादर करावा.

१३. यावरील होणारा खर्च मागणी क्रमांक एक्स-१, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२, समाजकल्याण, १०३, महिला कल्याण, (२१) (०१) महिला समुपदेशन केंद्रे, (२२३५ ३१७ ७) ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेत्तर) या उपलेखाशिर्षामध्ये उपलब्ध असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा व तो त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

१४ सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१७२/१२/व्यय-सहा, दि.१७.३.२०१२ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६१२१७४२४८२३३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Smita Dattatray Nivatkar

Digitally signed by Smita Dattatray Nivatkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women and Child Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3fa46cf1e928518ffc98619187a1ef6de2dd57c16934e9cb6672cc02aa258b08, serialNumber=f9bd2a7c214922f8f4939e80711ece461c9dfd9c679b28f98e79475c5ea90e21, cn=Smita Dattatray Nivatkar
Date: 2019.06.12 17:31:44 +05'30'

(स्मिता निवतकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री (गृह), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मंत्री / राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव, (व्यय) / (लेखा व कोषागारे), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१२. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे
१३. पोलीस महासंचालक, पोलीस मुख्यालय, मुंबई.
१४. विशेष पोलीस महानिरिक्षक (महिला अत्याचार प्रतिबंध कक्ष), पुणे.
१५. सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, बांद्रा, मुंबई.
१६. महाप्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई.
१७. महाप्रबंधक, उपलोकायुक्त व लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
१८. सर्व निबंधक, मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर / औरंगाबाद.

१९. सर्व जिल्हा न्यायाधीश, जिल्हा न्यायालय.
२०. सर्व जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय
२१. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
२२. राज्य समन्वयक (PPMU), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२३. सर्व पोलीस आयुक्त / पोलीस अधिक्षक यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
२४. महालेखापाल, महाराष्ट्र १ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परिक्षा), मुंबई.
२५. महालेखापाल, महाराष्ट्र २ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परिक्षा), नागपूर.
२६. उप आयुक्त (महिला विकास), महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२८. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
२९. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.
३०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
३१. सर्व मंत्रालयीन विभाग.
३२. सर्व अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३३. समन्वयक, महिला व बालकांचे विशेष कक्ष, टाटा सामाजिक विज्ञान संस्था, देवनार, मुंबई.
३४. परिशिष्ट-ब, परिशिष्ट-क व परिशिष्ट-ड मधील सर्व स्वयंसेवी संस्था (आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्यामार्फत)
३५. सर्व महिला समुपदेशन केंद्र / सेवा पुरविणारे / सर्व आश्रयगृहे (आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्यामार्फत)
३६. निवड नस्ती/का-१०.

शासन निर्णय क्र.समुप-२०१३/प्र.क्र.५ (भाग-२)/का-१०, दि. १२ जून, २०१९ चे परिशिष्ट

"परिशिष्ट-अ"

अ.क्र.	जिल्ह्याचे नाव	तालुक्याचे/ पोलीस स्टेशनचे नाव	समुपदेशन केंद्र मंजूर झालेल्या संस्थेचे नाव, पूर्ण पत्ता, नोंदणीकृत तालुका व जिल्हा
१	मुंबई शहर (आयुक्त, मुंबई निवडतील ती ३ पोलीस स्टेशन केंद्रे)	वडाळा टी.टी. पोलीस स्टेशन	**स्त्री मुक्ती संघटना,** ३१ श्रमिक (रॉयल क्रेस्ट), लोकमान्य टिळक वसाहत रोड क्र.३, दादर (पूर्व), मुंबई-४०० ०१७.
२		डी.बी.मार्ग पोलीस स्टेशन	**स्त्री शक्ती केंद्र,** ऑगस्ट क्रांती मैदानासमोर, गोवालिया टँक, मुंबई-४०० ००७.
३	वाशिम	कारंजा	**श्रावस्ती बहुउद्देशीय संस्था,** मानोरा रोड, व्दारा-डी.जी.इंगोले, चंद्रलोक नगर, ता.कारंजा, जि.वाशिम
४	नांदेड	मुखेड	**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सेवाभावी संस्था,** मु.हरबळ (प.उ.), ता.लोहा, जि.नांदेड.
५	हिंगोली	हिंगोली	**उज्वल शिक्षण प्रसारक मंडळ,** "उज्वल", सरस्वती नगर, हिंगोली, ता. जि.हिंगोली
६	हिंगोली	औंढा (ना.)	**लोकाशा ह्युमन डेव्हलपमेन्ट ॲन्ड रिसर्च सेंटर,** मु.बेरुळा, पो.उखळी, ता.औंढा (ना.) जि.हिंगोली.
७	हिंगोली	वसमत	**संतोषी माता महिला मंडळ,** मु.पो.आरळ, ता.वसमत जि.हिंगोली-४३१ ५१२.

"परिशिष्ट-ब"

अ.क्र.	जिल्हयाचे नाव	तालुक्याचे/ पोलीस स्टेशनचे नाव	समुपदेशन केंद्र मंजूर झालेल्या संस्थेचे नाव, पूर्ण पत्ता, नोंदणीकृत तालुका व जिल्हा
१		लाखांदुर	**संजीवनी वूमेन्स अकॅडमी ॲन्ड मल्टीपरपज इन्स्टिट्युशन, भंडारा.** व्दारा-सौ.जया रोकडे, सत्कार नगर, नागपूर रोड, भंडारा, ता.जि.भंडारा.
२	धुळे	शिरपूर	**जिजामाता महिला मंडळ,** निमडाळे, ता.जि.धुळे

"परिशिष्ट-क"

अ.क्र.	जिल्हयाचे नाव	तालुक्याचे/ पोलीस स्टेशनचे नाव	समुपदेशन केंद्र मंजूर झालेल्या संस्थेचे नाव, पूर्ण पत्ता, नोंदणीकृत तालुका व जिल्हा
१	सिंधुदुर्ग	कणकवली	**बॅ.नाथ पै. शिक्षण संस्था, सिंधुदूर्ग.** ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग.

Smita Dattatray Nivatkar

Digitally signed by Smita Dattatray Nivatkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women and Child Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3fa46cf1e928518ffc98619187a1ef6de2d57c16934e9cb6672cc02aa258b08, serialNumber=f9bd2a7c214922f8f4939e80711ece461c9dfd9c679b28f98e79475c5ea90e21, cn=Smita Dattatray Nivatkar
Date: 2019.06.12 17:32:57 +05'30'

(स्मिता निवतकर)

उप सचिव, महाराष्ट्र शासन